

पीपल्स एज्युकेशन सोसायटी (मुंबई) चे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,**
**नागसेनवन, औरंगाबाद**
**आणि**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**अनुदान आयोग**
**यांच्या संयुक्त विद्यमाने**

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र.

# दलित, बहुजन व अल्पसंख्यांक स्त्रींची सद्यस्थितीतील दशा व दिशा





पीपल्स एज्युकेशन सोसायटी (मुंबई) चे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,

नागसेनवन, औरंगाबाद

आणि

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

अनुदान आयोग

यांच्या संयुक्त विद्यमाने

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

# दलित, बहुजन व अल्पसंख्यांक स्त्रींची सद्यस्थितीतील दशा व दिशा

०३-०३-२०१७

मराठी भाग - १

Editor

Principal

**Dr. Kishor Salve**

Dr. Babasaheb Ambedkar Art's and Commerce College, Nagsevan, Aurangabad. (M.S.)

**Ajanta Parkashan**

Jaisingpura, Aurangabad.

# अणुक्रमाणिका मराठी भाग - १



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार<br>प्रा. बोंतेवाड नागेश रामलु | ९२-९४ |
| २५ | महिला सबलीकरण व महिला बचतगट<br>सहा. प्रा. अवनी अमित नागले | ९५-९७ |
| २६ | बहूजन स्त्रीयांची काल, आज आणि उद्याची सामाजिक सशक्तीकरण व सबलीकरणाची भूमिका<br>प्रा. डॉ. केवटे अशोक आर.<br>आशा कृष्णा बनकर | ९८-१०० |
| २७ | भारतीय राजकारण आणि महिला<br>कु. रोहिणी शामप्रकाश करेवार | १०१-१०३ |
| २८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य<br>प्रा. घाडगे सोमनाथ व्यंकटी | १०४-१०७ |
| २९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री विषयक भूमिका<br>प्रा. नामदेव शिनगारे | १०८-१११ |
| ३० | फुले, शाहू, आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण<br>डॉ. केवटे अशोक आर. | ११२-११४ |
| ३१ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१५ आणि दिव्यांग<br>किर्तीकर वाल्मिक भीमराव | ११५-११८ |
| ३२ | बहूजन समाजातील स्त्रीयांचे सामाजिक सक्षमीकरण<br>गव्हांदे संदिप भास्कर | ११९-१२० |
| ३३ | महात्मा ज्योतीराव फुले यांचे स्त्री-सुधारणा विषयक विचार व कार्य<br>प्रा.घाडगे गौतम व्यंकटी | १२१-१२४ |
| ३४ | राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री शिक्षणविषयक विचार व कार्य<br>प्रा. घाडगे रघुनाथ व्यंकटी | १२५-१२७ |
| ३५ | महात्मा फुले, राजर्षी शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री सुधारणा विषयक कार्य<br>अमृता विष्णू जोगदंड | १२८-१३१ |
| ३६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य<br>सिरसीकर वैशाली भगवानराव | १३२-१३४ |

# २९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री विषयक भूमिका

**प्रा. नामदेव शिनगारे**
मराठी विभाग, महिला कला महाविद्यालय, गेवराई.

**प्रस्तावना**

मानवाचे कल्याण त्याचा विकास त्यासाठी दिलेले क्रांतीचे लढे व त्यांच्या पूर्वपिठीकांचा इतिहास गौतम बुध्दापासून सुरु होतो. म.फुले, संत कबीर, संत गाडे महाराज, शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत येऊन स्थिरावतो. संपूर्ण मानव कल्याणाच्या विकासासाठी आपलं संपूर्ण आयुष्य वाहिलं, त्या सर्वांमध्ये एक समान धागा होता. माणूस हाच त्याचा केंद्र होता. ही सामाजिक संघर्षाची चळवळ ज्यानं त्यानं आपल्या परीनं आपापल्या काळात अगदी मनापासून राबविली. त्यासाठी त्यांनी आपल्या वैयक्तीक जीवनाचा त्याग करुन सार्वजनिक लोककल्याणाचा ध्यास घेवून शेवटच्या श्वासापर्यंत ते एकनिष्ठ होते. याची पावती त्यांच्या सबंध कार्यातून आपणाला पदोपदी जानवते.

स्वातंत्र, समता, न्याय आणि बंधुभाव हा भारतीय घटनेचा मूळ गाभा व त्या तत्वावर वाटचाल करणारी आपण माणसं आहोत. परंतु आज आपण भौतिक जीवनामध्ये इतके रममाण झालो आहोत की, आपण आपले घर, आपली मुलं, आपलं आपल्याला वाटणारं भौतिक सुख यामध्येच फरफटत चाललो आहोत. या सर्वांपेक्षाही एक वेगळं जग आहे, आपण त्या वेगळया जगातील एका समाजाचा घटक आहोत हेच विसरलो गेलो आहोत. त्याग आणि समर्पण हे केवळ बोलण्यापुरतेच राहिले आहे.

आज स्वातंत्र्य मिळूनही समता प्रस्तापित करु शकलो नाही. चातुर्वण्य व्यवस्थेचा पगडा आजही आहे. स्त्री-पुरुष समानताही आपणाला कागदावरच दिसते. उदाहरणच द्यायचे झाले तर त्या पदाचा कारभार तिचा पतीच करतो. हे सर्वश्रूतच आहे. त्याला कारण इथला धर्म आणि इथल्या प्रथा परंपरा होय.

स्त्री ही धर्माने लादलेल्या अनिष्ट बंधनात बांधल्या गेली होती. संस्कृतीने लादलेले अनिष्ट वाईट, अकुशल, खोटे, ती स्विकारत गेली लादणे व स्विकारणे यातूनच स्त्रियांच्या वेदनांना व दुःखांना सुरुवात झालेली दिसते. बुध्दपूर्व काळात भगवान महाविरांच्या क्रांतीकारी जैन धर्माचा उदय असला तरीही महाविरांच्या धर्मात स्त्री-पुरुष समतेला स्थान नव्हते. स्त्री ही पुरुषाप्रमाणे निर्वाण प्राप्त करु शकत नाही. म्हणून तिचे स्थान जैन धर्माने नाकारले. एकंदरीतच स्त्री म्हणजे धर्माच्या आणि मोक्षाच्या मार्गातील धोंड आहे हेच सर्वमान्य होते.

बुध्दाच्या काळात भगवान बुध्दाने खज्या अर्थाने परिवर्तनवादी विचारांची पेरणी करीत स्त्रियांच्या मुक्तीची दारे मोकळी केली. माणूस म्हणून नाकारलेली मूल्ये सर्वप्रथम बुध्दाने स्त्रियांना बहाल केली. समतामूलक दृष्टीकोणातून सन्मानाची वागणूक देत त्यांच्या स्वअस्तित्वाची जाणीव निर्माण करण्याचे श्रेय तथागत बुध्दाकडे जाते. ज्या काळात कोणत्याही जातीवर्गातील स्त्रियांना कवडीची किंमत नाही. अशा काळात सर्व वर्गातील स्त्रियांना घेऊन, धर्माचे महत्व जाणून घेत बुध्दाने भिक्षूणी संघाची स्थापना केली व त्यांना सांस्कृतिक नेतृत्व बहाल केले.

स्त्री ही भोगाची वस्तू नव्हे तर तिलाही मूल्य आहे. तिलाही व्यक्तीमत्व आहे. हा विचार रुजवत तिही अर्हत पदाची व्याप्ती करु शकते. ती धर्म मार्गातील धोंड नाही तर पुरुषांच्या बरोबरीने तिलाही तो अधिकार आहे. ही हक्काची जाणीव तथागत बुध्दाने करुन दिली.[१]

**स्त्री शिक्षणासंबंधी मननीय उदगार**

- **रा. ल. ब. भोपटकर -** "हिंदुस्थानच्या लोकांनीच या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही."
- **महाराष्ट्र माहेश्वरी परिषदेचे अध्यक्ष बाबू गोविंददास-** "स्त्री शिक्षणाची महती तर फारच आहे. आपल्या स्त्रिया सुशिक्षित झाल्याशिवाय आपणांस आपले पूर्व वैभव प्राप्त करुन घेता यावयाचे नाही."
- **सौ.पं.मनोरमाबाई -** "प्रत्येक व्यक्तीने आपली सुधारणा करुन घेण्याचा प्रयत्न केल्यास, सगळया जातीची सुधारणा होण्यास वेळ

येणार नाही. समाजाचे अर्धांग ज्या स्त्रीया त्या अशिक्षित राहिल्यास समाजाची सुधारणा व उन्नती झाली असे म्हणता येणार नाही. पुरुषांच्या ... स्त्रियांस शिक्षण देण्याची आवश्यकता विशेष आहे. गृहव्यवस्थेची, मुलाबाळांच्या संगोपन संवर्धनाची जबाबदारी स्त्रीवर असते म्हणून सुशिक्षित स्त्री अशिक्षित स्त्रीपेक्षा सरस ठरते."

• मुलींस शिक्षण दिल्यास त्यांच्या ठिकाणी स्वाभिमानाची ज्योत किती प्रबळ, जाज्वलित असते हे आमच्या बहिष्कृतात गणलेल्या भगिनी अनुसयाबाई कांबळे यांचे पत्र वाचल्यास दिसून येईल. या ठिकाणी आम्हाला एवढेच सुचवायचे आहे की, बहिष्कृत समाजाला आपली उन्नती होऊन आपण इतर पुढारलेल्या लोकांच्या बरोबरीचे व्हावे असे वाटत असल्यास त्यांनी आपल्या उन्नती गाड्याचे दुसरे चाक जो स्त्री समाज, त्याची बरोबर व्यवस्था ठेवून आपल्याच बरोबरीने त्यांनाही शिक्षणाचा लाभ मिळवून दिला पाहिजे. तरच हा आपला गाडा निटपणे चालून लवकरच आपल्या इच्छित जागी सुरक्षितपणे पोहोचेल.[२]

**स्त्रीयांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून**

दि.२० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे आयोजित ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुईमेन्य कॉन्फरन्स मध्ये महिलांना उद्देशून डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले.

या प्रसंगी तुमच्या परिषदेत बोलतांना मला आनंद होत आहे. दलित वर्गाच्या प्रगतीची कल्याणाची इच्छा बाळगणाऱ्या माणसाला हा स्त्रियांचा समुदाय पाहून जेवढा आनंद होईल त्यापेक्षा अधिक आनंद दुसऱ्या कोणत्याही प्रसंगी होणार नाही. तुम्ही इतक्या २० ते २५ हजारांच्या संख्येने येथे उपस्थित राहाल ही गोष्ट दहा वर्षापूर्वी कल्पना सुध्दा करण्यासारखी नव्हती. स्त्रीयांच्या संघटनेवर फार मोठा विश्वास ठेवणारा मी माणूस आहे. त्यांना जर विश्वासात घेतले तर समाजाची सुधारणा करण्यासाठी त्या काय करु शकतात हे मी जाणतो. सामाजिक दोष नाहिसे करण्याची त्यांनी फार मोठी सेवा केलेली आहे. माझ्या स्वतःच्या अनुभवावरुनही हे मी सिध्द करुन देईल. दलित वर्गामध्ये काम करण्यास जेव्हापासून मी सुरुवात केली तेंव्हापासून पुरुषांबरोबर स्त्रीयांही सहभागी झालेल्या आहेत. म्हणूनच आपल्या परिषद मिश्र परिषद आहेत. असे तुम्हास दिसून येईल. स्त्रीयांचीच प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मी मोजित असतो. म्हणूनच हा समुदाय पाहिल्यावर मला खात्री वाटते व आनंद होतो की आम्ही प्रगती केलेली आहे. तुम्ही मनात नीट जपून ठेवाव्या अशा कांही थोड्याशा गोष्टी तुम्हास सांगतो.

स्वच्छ राहण्यास शिका व सर्व दुर्गुणांपासून मुक्त राहा. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. हळूहळू त्यांच्या मनात महत्वाकांक्षा जागृत करा. ते थोर पुरुष होणार आहेत असे त्यांच्या मनावर बिंबवा. त्यांच्यातील हीनगंड नाहिसा करा. लग्न करण्याची घाई करु नका. लग्न म्हणजे जबाबदारी. लग्नामुळे निर्माण होणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्याइतपत आर्थिकदृष्ट्या समर्थ झाल्याशिवाय त्यांच्यावर लग्न लादू नका. जे लग्न करतील त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की अती जास्त मुले होणे हे दुष्ट कृत्य आहे. आपल्या लहाणपणी आपणाला मिळू शकली त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या प्रत्येक मुलाला देणे हे आई वडिलांचे कर्तव्य आहे. सर्वात अधिक महत्वाचे म्हणजे लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरमणे तिने नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा. या उपदेशाचे तुम्ही पालन केले तर तुम्हा सर्वांना मानसन्मान व किर्ती प्राप्त होईल एवढेच नव्हे. तर दलित वर्गालाही सन्मान व किर्ती मिळेल अशी खात्री आहे.[३]

**हिंदू कोड बील**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रीयांवर अनेक उपकार करुन ठेवले आहेत. भारतीय स्त्रीयांच्या जीवनात क्रांतीकारी बदल आणू पाहणाऱ्या हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कार्याची म्हणावी तशी दखल आपल्या भगिनीवर्गाने घेतलेली नाही.

भारतीय परंपरेने स्त्रीला कायमच जोखडात ठेवले आहे. तिने बालपणी पित्याच्या, तरुणपणी पतीच्या आणि म्हातारपणी पुत्राच्या अधिपत्याखाली राहावे अशी व्यवस्था मनुस्मृतीने करुन ठेवली आहे. स्त्रियांना समग्र विकास आणि उत्थानाचा जाहीरनामा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलातून सादर केला. त्यावेळी बाबासाहेब भारताचे कायदेमंत्री होते. हिंदू कोड बिलाविषयी त्यांनी म्हटले होते की, "समाजातल्या वर्गावर्गातली असमानता, स्त्री - पुरुष यांच्यातली असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे

म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिकाऱ्यावर राजमहाल बांधण्यासारखे होय."

बाबासाहेबांनी १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस अविरत कष्ट करुन हिंदू कोड बिल तयार केले होते. स्त्रीयांना कायद्याने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याचे स्वप्न त्यांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून पाहिले. हे बिल सात वेगवेगळ्या घटकांशी निगडित कायद्याचे कलमात रुपांतर करु पाहणारे होते. हे सात घटक खालीलप्रमाणे.

१) जी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत पावली असेल अशा मृत हिंदू व्यक्तीच्या (स्त्री आणि पुरुष दोघांच्याही) मालमत्तेच्या हक्कांबाबत.

२) मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार

३) पोटगी

४) विवाह

५) घटस्फोट

६) दत्तक विधान

७) अज्ञानत्व व पालकत्व

हे सातही विषय स्त्रियांच्या दृष्टीने किती महत्वाचे आहेत. भारतीय संविधान सभेने जात, धर्म किंवा लिंगभेद करुन मानव प्राण्यात कायदा भेदाभेद करणार नाही, न्यायाच्या तराजूत सर्वांना एकाच मापात तोलले जाईल, अशी घोषणा करुन स्वातंत्र्य समता या तत्वांचा अंगीकार केलेला होता. या पार्श्वभूमीवर हिंदू स्त्रियांना त्याचे न्याय हक्क देण्यास विरोध झाला, हे अतिशय दुर्दवी होते.

या बिलातील घटस्फोट, द्विभार्या या कलमांना सनातनी मनोवृत्तीच्या विरोधकांनी प्रचंड विरोध केला. सुधारणेच्या युगात स्त्रीयांना समान हक्क द्यायला तुम्ही विरोध का करत आहात, असा सवाल डॉ.आंबेडकरांनी प्रतिगामी विरोधकांना २० सप्टेंबर १९५१ रोजी केला. हिंदू कोड बिल संमत व्हावे म्हणून बाबासाहेब एकटेच योध्यासारखे लढले. पण दुर्देवाने सत्र संपताना या बिलाची केवळ ४ कलमेच मंजूर झाली होती. यास्तव अत्यंत दुःखी कष्टी होऊन डॉ.आंबेडकरांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. भारतीय स्त्रियांच्या हक्कांसाठी केवढा मोठा त्याग बाबासाहेबांनी केला.

डॉ.आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मंजूर करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. मात्र डॉ.राजेंद्र प्रसाद, शंकराचार्य, ब्रम्हानंद सरस्वती, स्वामी करपात्री, पट्टाभी सीतारामच्या या नेत्यांनी बाबासाहेबांचे प्रयत्न सफल होऊ दिले नाहीत.

**समारोप**

मानव कल्याण हेच ध्येय समोर ठेवून येथील समाज सुधारकांनी अपार कष्ट सोसले. प्रवाहाबरोबर वाहणे हा निसर्गाचा नियम असला तरी प्रवाहाविरुध्द प्रवास करणे फार कठीण असते. ते पेलण्याचे सामर्थ्य सर्वसामान्य व्यक्तीमध्ये नसते त्याला आपल्या वैयक्तीक जीवनाचा त्याग करुन सार्वजनिक लोककल्याणासाठी स्वतःची तिलांजली द्यावी लागते. ती देण्याचे धाडस इथल्या महामानवांनी केले. तथागत गौतम बुध्दांपासून सुरु होणारा सामान्यांचा व स्त्री उन्नतीचा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कालखंडात स्थिरावतो.

वर्णव्यवस्थेत अडकलेल्या इथल्या समाजाला अनिष्ट प्रथा परंपरेच्या गर्ततून बाहेर काढण्याचे काम येथील समाजधुरीनांनी केले. त्याच बरोबर येथील स्त्रीयांची स्थिती अत्यंत दयनीय होती. त्यांना भगवान बुध्दाने परिवर्तनाची पेरणी करीत स्त्रीयांच्या मुक्तीची द्वारे खुली केली. व त्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करुन दिली व समतामूलक दृष्टीकोणातून सन्मानाची वागणूक दिली. तोच धागा पकडून म.फुले, राजर्षी शाहू महाराज, ...गीर, संत गाडगेबाबा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विचारातून आणि कृतीतून स्त्री स्वातंत्र्यासाठी आणि एकूणच मानव जातीसाठी आपले आयुष्य वेचले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तर हिंदू कोड बील हे येथील स्त्रीयांच्या हक्कासाठी असणाऱ्या बीलाच्या अनुषंगाने आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला होता.

... तडजोडीच्या राजकारणात खुर्ची कशी टिकेल याकडेच मंत्र्याचे लक्ष असते. येथील समाजाची आहुती गेली तरी चालेल पण खुर्ची मात्र शाबूत राहिली पाहिजे. अशी स्थिती आजच्या राजकारण्यांची आहे. सोयीचे राजकारण केले जात आहे याचीच खंत वाटते.

**संदर्भ ग्रंथ**


१) आंबेडकरी उर्जेचे नवक्षितीज- संपा. विश्वजीत कांबळे प्रा.अरुण दसोडे- विद्यार्थी साहित्य प्रकाशन, यवतमाळ

२) मूकनायक ११ सप्टेंबर १९२०

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड १८ भाग-२ १९३७ ते १९४५ (पृ.क्र.४२७)

४) हिंदू कोड बिल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर http://jdattatray४४४.globalmarathi.com


Principal
J.B.S.P.M's Mahila College,
Tq. Georai, Dist. Beed.